# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/११२/२०१५/२०१६/१२९०	दि. १८.०१.२०१६

प्रति,
श्रीमती संगिता गो. लांडे,
कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
३ रा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत...**

**संदर्भ :- आपले क्र. माअअ-२०१५/प्र.क्र.४१९/ऊर्जा-१, दि. ०१.०१.२०१६ रोजीचे पत्र.**

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, श्री. भगवान मावजी दाठिया यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत आयोगाच्या कार्यालयाला प्राप्त झालेल्या अर्जातील, आयोगाच्या कार्यालयाशी संबंधीत मुद्दे क्र. १ ते ४ ची माहिती दि. १५.१२.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे अर्जदारांना देण्यात आलेली आहे. सदर पत्राची प्रत या पत्रासोबत पाठवित आहे.

आपला विश्वासू,

प्रमोहरे

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे

१८/१/२०१६
लिपिक (ऊर्जा)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/११२/२०१५/११३६ दि. १५.१२.२०१५

प्रति,
श्री भगवान मावजी दाठिया
एच-१०, जनकल्याण को. ऑप. हौ. सो.,
PMGP कॉलनी, मानखुर्द,
मुंबई - ४०० ०४३.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत...

संदर्भ :- आपले दि. २७.११.२०१५ रोजीचे पत्र.

महोदय,

आपला दि. २७ नोव्हेंबर, २०१५ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास त्याच दिवशी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आवश्यक माहितीचा तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | मुंबईतील उपनगरात विज पुरवठा करणाऱ्या रिलायन्स एनर्जी लिमिटेड या कंपनीला विज पुरवठा करण्याची मंजूरी कोणी दिली. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १४ मधील अधिकारान्वये, सन २०११ चे प्रकरण क्रमांक ६५, दिनांक ११ ऑगस्ट २०११ रोजीच्या पारित केलेल्या आदेशाद्वारे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला मुंबई उपनगरात वीज वितरण करण्यासाठी परवाना प्रदान केला आहे.<br>या आदेशाची प्रत आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. (एकूण पृष्ठे ३८) |
| २. | मंजूरी देताना कोणकोणत्या अटी टाकण्यात आल्या, या कंपनीशी किती वर्षाचा पुरवठा करण्याचा करार केलेला आहे. | परवान्याचा कालावधी व परवान्याच्या अटी या सदर कंपनीला प्रदान केलेल्या परवान्यामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.<br>प्रकरण क्र. १ /२०११ संदर्भात देण्यात आलेला वितरण परवाना आयोगाच्याwww.merc.gov.in संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. (एकूण पृष्ठे ६) |
| ३. | त्यांना किती विज आकार घेण्याची अनुमती देण्यात आली. विज आकार व्यतिरिक्त कोण-कोणत्या टॅक्स घेण्याची मंजूरी दिली गेली. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ नुसार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने वेळोवेळी वीज दर निश्चितीकरणासाठी आयोगाकडे याचिका दाखल केल्या होत्या. आयोगाने विद्युत |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| ४. | रिलायन्स एनर्जी लि. कंपनी सर्व अटींचे पालन करीत आहे का, या कंपनीने विज आकार किती वेळा वाढवला, त्याची मंजूरी घेतली का, त्यावेळेस जनतेची सहमती घेतली होती का, विज पुरवठा करण्यास खाजगी कंपनीला का नेमले गेले, विज पुरवठा करण्यास स्वत: सक्षम नाही का ? | अधिनियम, २००३ मधील तरतुदींनुसार सदर याचिकांवर जनतेकडून हरकती व सूचना मागवून तसेच जाहीर सुनावणी घेऊन त्यासंदर्भातील आदेश पारित केले आहेत. सन २०१५ चे प्र. क्र. ४ मधील दि. २६ जून २०१५ रोजी पारित केलेला आदेश आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (एकूण पृष्ठे ३९९) |
| ५. | रिलायन्स एनर्जी लिमिटेड कंपनीला माहितीच्या अधिकाराच्या अंतर्गत का सामिल केले गेले नाही. या सर्व बाबतची सविस्तर माहिती संबंधित कागदपत्रासह छायांकित प्रती साक्षांकीत करुन देण्यात यावी. | सदरचा मुद्दा आयोगाच्या कार्यालयाशी संबंधीत नाही. |

उपरोक्त माहितीमध्ये नमूद केलेल्या आदेशांची छायांकित प्रती आपणास हवी असेल तर रु. ८८६ + १५० = १०३६/- (रु.४४३/- X रु. २/- + रु.५०/- टपाल खर्च) इतक्या रकमेचा मुंबई येथे देय असलेला ''महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग'' नावाने धनाकर्ष (Demand Draft) आयोगाच्या कार्यालयात जमा करण्यात यावा अथवा आयोगाच्या कार्यालयात येऊन प्रत्यक्ष रकमेचा रोख भरणा करावा जेणे करुन आपणास माहिती उपलब्ध करणे शक्य होईल.

उपरोक्त दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी